# आकाशवाणी पुणे
# प्रादेशिक वृत्त विभाग
# पुणे वृत्तांत
# वेळ - संध्याकाळी 06.00 वा.

**दिनांक- 22.10.2025** **वार- बुधवार**

---

**दिवाळी**

दिवाळीच्या पर्वानिमित्त पुणे आणि परिसरात चैतन्याचं वातावरण आहे. आज कार्तिक शुद्ध प्रतिप्रदा म्हणजेच बलिप्रतिपदा. पती-पत्नीच्या स्नेहार्द्र नात्याचा उत्सव दिवाळी पाडव्याचा सण साजरा होत आहे. साडे तीन मुहूर्तांपैकी एक असलेल्या या मुहूर्तावर गृहखरेदी, नवीन वस्तू तसंच सोने-चांदी खरेदी केली जाते. या निमित्तानं बाजारपेठेत उत्साहाचं वातावरण आहे.

पुणे शहरात विविध ठिकाणी पाडवा पहाट कार्यक्रमांचं आयोजन करण्यात आलं. नटून सजून उत्साही पुणेकर या कार्यक्रमांना हजेरी लावताना दिसले. सारसबागेतला दिवाळी पहाट कार्यक्रम प्रथेप्रमाणं साजरा झाला. राजाराम पुलाजवळ आयोजित पाडवा पहाट कार्यक्रमात पंडित विश्वमोहन भट यांच्या मोहनवीणेचे स्वर झंकारले. मराठी माझा अभिमान असोसिएशनतर्फे आयोजित सुरमयी दिवाळी पहाट कार्यक्रमात गायक ऋषिकेश रानडे आणि प्राजक्ता रानडे यांनी सुमधुर सादरीकरण केलं. शिवाजीनगरमधील मनपा वाटिकेच्या निसर्गरम्य वातावरणात आयोजित गीत मैफिलीचाही पुणेकरांनी मोठ्या संख्येनं आस्वाद घेतला.

**प्राधिकरण**

पुणे महानगर क्षेत्र विकास प्राधिकरणाकडून पश्चिम भागातील 120 आणि पूर्व भागातील 130 अशा एकंदर 230 गावांमध्ये सांडपाणी वाहिन्यांचं जाळं आणि मैलापाण्यावर प्रक्रिया करण्यासाठी केंद्र उभारण्यात येणार आहेत. या कामासाठी सुमारे एक हजार कोटी रुपये खर्च अपेक्षित असून, पहिल्या टप्प्यात पश्चिमेकडील गावांसाठी 300 कोटी रुपयांचा आराखडा तयार करण्यात आला आहे. त्याची निविदा प्रक्रिया सुरू करण्यात आली आहे अशी माहिती प्राधिकरणाचे आयुक्त योगेश म्हसे यांनी दिली.

**<u>नियोजन</u>**

पुणे जिल्हा नियोजन समितीच्या मंजूर आराखड्यापैकी 900 कोटींच्या कामांना मान्यता मिळाली असून, त्यापैकी 600 कोटी रुपयांच्या कामांसाठीचे कार्यादेश पुणे जिल्हा प्रशासनाकडून देण्यात आले आहेत. त्याअंतर्गत जिल्ह्याच्या विविध भागांत मॉडेल स्कूल आणि प्राथमिक आरोग्य केंद्रांची कामं येत्या काही दिवसांमध्ये सुरू करण्यात येणार आहेत. जिल्हा नियोजन समितीकडून 1 हजार 400 कोटींचा वार्षिक आराखडा करण्यात आला आहे. जिल्हा नियोजन समितीच्या आराखड्यामध्ये जिल्ह्यातील 303 आदर्श शाळा उभारण्याचं नियोजन तसंच, 108 प्राथमिक आरोग्य केंद्रांचं सक्षमीकरण करण्यात येणार आहे. त्याशिवाय शिक्षण, आरोग्यासाठी प्रत्येकी 100 कोटी, बंधारे तलाव दुरुस्तीसाठी 25 कोटींची तरतूद करण्यात आली असून, ग्रामीण रस्ते, जिल्हा मार्ग होणार आहेत.

**<u>खड्डे</u>**

पुण्यासारख्या शहरासाठी सायकल मार्ग असणं हे निश्चितच कौतुकास्पद आहे; परंतु सध्या पुण्यात रस्त्यांवर मोठ्या प्रमाणात खड्डे आहेत त्यामुळं रस्त्यांवरील खड्डे बुजवा आणि सायकल ट्रॅक करा, अशी मागणी नागरिकांनी पुणे महापालिका आयुक्त नवल किशोर राम यांच्याकडं केली आहे. लहान मुलांपासून ते ज्येष्ठ नागरिकांपर्यंत सर्वांसाठी सुरक्षित सायकल प्रवास व्हावा, यासाठी पुणे शहरभर 75 किलोमीटर सायकल मार्गाचं जाळं उभारलं जात आहे.

**<u>म्हाडा</u>**

पुणे, पिंपरी-चिंचवड शहर आणि पीएमआरडीएमधील 6 हजार 168 घरांसाठी 11 सप्टेंबरपासून अर्ज करण्यास सुरुवात झाल्यापासून 28 हजारांहून अधिक अर्ज आले असल्याची माहिती म्हाडा पुणे विभागाचे मुख्य अधिकारी राहुल साकोरे यांनी दिली आहे. यंदा अर्ज भरण्याच्या काही बाबींमध्ये बदल करण्यात आला असून अर्जदार तसंच अर्जदाराच्या जोडीदाराचे आधारकार्ड आणि पॅनकार्ड डीजी लॉकरवरूनच प्राप्त करून घेणं गरजेचं आहे. त्याकरिता अर्जदाराला डीजी लॉकरवर नोंदणी करून आवश्यक माहिती अद्ययावत करावी लागणार आहे. म्हाडाच्या घरांसाठी अर्ज करण्याची मुदत येत्या 31 ऑक्टोबरपर्यंत आहे.

**<u>दिवाळी</u>**

पुण्यातील संयुक्त प्रसाद मित्रमंडळाच्यावतीनं भोर तालुक्यातील कातकरी, आदिवासी पाड्यावर राहणाऱ्या दीडशे कुटुंबांसोबत दीपावली सण साजरा करण्यात आला. तसंच नसरापूर इथल्या खेलाडी आणि कासरडी गावातील दुर्बल घटकांबरोबरही मंडळानं दिवाळी साजरी केली. उपक्रमाचं यंदा तेरावं वर्ष होतं. या कुटुंबांना दिवाळी फराळ, कपडे तसंच जीवनावश्यक वस्तूंचे संच देण्यात आले.

**<u>बंगाली</u>**

बंगाली समाजाकडून साजरा केला जाणारा काली पूजा उत्सव उत्साहात सुरू झाला आहे. मागील पंचवीस वर्षापासून हा उत्सव पुण्यात साजरा केला जात असून त्यात अनेक बंगाली बांधव सहभागी होत असतात. महाराष्ट्रात 45 वर्षापासून बंगाली बांधव सोन्याचे कारागीर म्हणून शहरात कार्यरत आहेत. कसबा विधानसभा मतदारसंघाचे आमदार हेमंत रासने यांनी कालीमातेचं दर्शन घेतलं. बंगाली समाजाकडून साजरा केल्या जाणाऱ्या श्री श्री श्यामा काली पूजा उत्सवाच्या आजच्या दुसऱ्या दिवशी रक्तदान शिबिर  घेण्यात आलं. यामध्ये शंभरहून अधिक बाटल्या रक्त संकलन करण्यात आलं. याप्रसंगी विविध समाजोपयोगी कार्यक्रमांचेही आयोजन करण्यात आलं होतं. तसंच आदिती चक्रवर्ती , पार्थ दत्त, आनंदिता चंदा यांनी गायन सादर करत उपस्थित श्रोत्यांची मनं जिंकली, या उत्सवाचा समारोप उद्या होणार आहे.

**<u>बाजार बंद</u>**

भाऊबीज सणानिमित्त उद्या पुणे कृषी उत्पन्न बाजार समितीच्या आवारातील फळे, भाजीपाला बाजार, पान बाजार, केळी बाजार बंद राहणार आहे. त्याचप्रमाणे मोशी इथला उप बाजारही बंद राहणार असून शेतकऱ्यांनी आपला शेतीमाल बाजारपेठेत आणू नये असं आवाहन बाजार समिती प्रशासनाने केलं  आहे. शुक्रवारी पहाटेपासून बाजारपेठेतील नियमित व्यवहार सुरू राहणार आहेत.

**हा होता आजचा पुणे वृत्तांत. उद्या पुन्हा भेटू विविध भारती पुणे केंद्रावर, संध्याकाळी सहा वाजता, ताज्या पुणे वृत्तांतमध्ये, नमस्कार.**